# उमेदवाराकरीता सूचना

## -: परिशिष्ट- 01 :-

1. वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणांमध्ये वाढ, घट अथवा बदल होण्याची शक्यता आहे.
2. सदरची परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी, सो.म.न.पा. यांनी राखून ठेवला आहे.

**परीक्षा शुल्क :-**

| गट | आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|---|
| | खुला प्रवर्ग | अन्य इतर सर्व प्रवर्गाकरीता |
| गट 'अ' व 'ड' | **₹१,०००/-** | **₹९००/-** |

टिप:- माजी सैनिक व दिव्यांग माजी सैनिकांना उपरोक्त परिक्षा शुल्कातून सूट राहिल.

**सर्वसाधारण सूचना.**

१. संबंधित पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात/ अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता ग्राह्य धरली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

२. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांस प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल, त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

३. महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे विवाह नोंदणी दाखला/गॅझेट सादर करणे आवश्यक आहे.

४. पत्रव्यवहारासाठी स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयंअध्ययन मार्गदर्शन केंद्र/वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देऊ नये.

५. अर्जामध्ये दिलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणी दरम्यान काही कागदपत्रे संशयास्पद वाटली अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील माहिती व मूळ अर्जातील माहिती यामध्ये तफावत आढळून आल्यास अर्जामध्ये भरलेली माहिती खोटी आहे असे समजण्यात येईल. तसेच उमेदवार यांनी अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

६. वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडूबाबतचा अनुभव व अर्ज करावयाचा प्रवर्ग तसेच ज्या दिव्यांगांना मदतनीस आवश्यक आहे त्याबाबतचा तपशील या बाबी न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे व अचूक भरणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

७. ज्या उमेदवारांना यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखिल स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

राहील, तसेच खेळाडू, अनाथ, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणा अंतर्गत येणाऱ्या उमेदवारांनी पुराव्यासह स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

८. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

९. अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्याकरीता विहित केलेल्या अंतिम दिनांकास करण्यात येईल.

- **वयोमर्यादा / वयोमर्यादा शिथिलता :-**

१. शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या- १२, दि. २५/०४/२०१६ नुसार सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे राहील तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी राहील.

२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र. ११४/१६ अ, दि. २९ मे, २०१९ अन्वये दिव्यांग उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

३. सामान्य प्रशासन विभाग शुध्दीपत्र क्र. मासेक १०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि. २०/०८/२०१० अन्वये दिव्यांग माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, वयाची कमाल मर्यादा ४५ वर्षेपर्यंत राहील.

४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. मासेक १०१०/ प्र.क्र.२७९/१०/१६-अ. दि. २०/०८/२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेत सवलत उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील.

५. प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- विकाक२२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ०४/११/२०१६.)

६. अंशकालीन उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे राहील. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अशंका १९९८/प्र.क्र.५०७/१६-अ, दिनांक ०२/०१/२०१९.)

७. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि. २० ऑगस्ट, २०१९ अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल.

८. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या- १२. दि.३/३/२०२३ नुसार कोरोनाच्या पार्श्वभूमीवर कमाल वयोमर्यादेत २ वर्षे शिथिलता अनुज्ञेय असेल.

| अ.क्र. | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | दि.03 /03/ 2023 अन्वये सुधारित वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | खुला प्रवर्ग | 18 | 38 | 40 |
| 2 | मागसवर्गीय उमेदवार | 18 | 43 | 45 |
| 3 | दिव्यांग उमेदवार | 18 | 45 | 47 |
| 4 | प्रकल्पग्रस्त | 18 | 45 | 47 |
| 5 | भुकंपग्रस्त | 18 | 45 | 47 |
| 6 | अंशकालीन | 18 | 55 | 57 |



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | माजी सैनिक | सशस्त्र दलात केलेली सेवा + 03 वर्षे सेवा | | सशस्त्र दलात केलेली सेवा + 03 वर्षे सेवा + 02 वर्षे |
| 8 | माजी सैनिक (दिव्यांग) | 45 | | 47 |
| 9 | खेळाडू | 18 | 43 | 45 |
| 10 | अनाथ | 18 | 43 | 45 |

*** उपरोक्त नमूद वयोमर्यादा ही अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास विचारात घेतली जाईल.**

*** फायरमन पदाकरीता कमाल वयोमर्यादा ३० वर्षे राहील, फायरमन या पदासाठी माजी सैनिक पात्र असल्यामुळे फक्त माजी सैनिकांना वयाबाबत सूट लागू राहिल.**

- **पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतूदी :-**

१. भरावयाच्या उपरोक्त संवर्ग पदांचे सामाजिक / समांतर आरक्षण तसेच वर नमूद केलेली पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२. पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची माहिती / बदल वेळोवेळी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

३. विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादीसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशानुसार राहील.

४. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. महिला २०२२/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये खुला प्रवर्ग तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे **नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

५. विमुक्त जाती (अ) भटक्या जमाती (ब) भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमदेवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

६. अर्ज करताना एखादी जात / जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यास तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवारांकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात / जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

७. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण- १११८/प्र.क्र.३८/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ व २८ डिसेंबर, २०१८ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

८. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.

९. नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अद्यावत असावे तसेच ते सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०. सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

११. अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकष या संदर्भातील अटींची पूर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारसीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

१२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी- 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, 12 डिसेंबर 2011 अन्वये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली असल्यास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात येईल. तथापी नियुक्ती आदेश प्राप्त झालेल्या उमेदवारानी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील. सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेस असमर्थ ठरल्यास अथवा समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास त्या उमेदवारांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल. व त्या उमेदवारांविरूध्द जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन - 2000 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

१४. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विषेश मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणाऱ्या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही ? याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

- **निवड पद्धत :**

**१. परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेचे ठिकाण. दिनांक व वेळ ई-मेल किंवा एस. एम. एस. (SMS) द्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यात येईल. तसेच सोलापूर महानगरपालिका अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्धीस देऊन माहिती कळविण्यात येईल. त्यामुळे अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी वेळोवेळी संकेत स्थळास भेट देणे आवश्यक राहील. ई-मेल किंवा एस. एम. एस. (SMS) मिळाला नाही ही सबब मान्य केली जाणार नाही.**

२. पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही.

**३. वरील सर्व पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. मात्र निवडसूचीतील उमेदवाराची व त्या उमेदवाराने सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यता पडताळणीसाठी (KYC Verification) उमेदवारांना प्रत्यक्ष बोलविले जाईल.**

४. उमेदवारांची निवड निव्वळ गुणवत्तेच्या आधारे केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी **खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ५० % व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५% गुण** प्राप्त करणे आवश्यक आहे.

५. परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

६. पात्र ठरणा-या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीकरीता पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल तसेच ई-मेल अथवा मोबाईलवर मेसेजद्वारे कळविण्यात येईल.

अंतिम निवडसूची (provisional selection list ) ही प्रवर्ग निहाय तयार करण्यात येईल व त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या पुढील प्रमाणे असेल.

| प्रवर्ग निहाय रिक्त पदांची संख्या | अंतिम निवडसूची विचारात घ्यावयाची उमेदवारांची संख्या |
|---|---|
| 1 | 3 |
| २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते |
| १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते |
| ५० किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के |

वरील प्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करताना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील पूर्णांक संख्या विचारात घेण्यात येईल.

७. कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, इ. बाबतची सर्व मुळ कागदपत्रे व त्यांच्या प्रत्येकी दोन स्वयंसाक्षांकीत (Self Attested) प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळुन आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

८. प्रमाणपत्र तपासणीकरीता येते वेळी अर्जासोबत जोडलेल्या दस्तऐवजांच्या मूळ प्रती व त्याची स्वयंसाक्षांकीत (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा व स्वतःचे आधार कार्ड व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

९. पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल व मोबाईल क्रमांकावर SMS किंवा E-mail द्वारे निवडसूची / प्रतिक्षा यादी व नियुक्ती बाबत कळविण्यात येईल. तसेच सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१०. नोंदणी प्रक्रियेनंतर प्रवेशपत्र डाउनलोड करण्यासाठी एक लिंक विकसित केली जाईल. लिंक होस्ट केल्यानंतर, उमेदवारांना ईमेल SMS द्वारे त्याबद्दल सूचित केले जाईल. उमेदवार थेट लिंकवरून त्याचे प्रवेशपत्र डाउनलोड करू शकतात. प्रवेशपत्राबाबत कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

११. निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

- **समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी :**

१. अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.

ब) समान गुण प्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतक-याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु क्र. (अ) नुसार एका पेक्षा अधिक उमेदवार समान गुण प्राप्त करीत असतील तर त्यापैकी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

क) वरील अनु क्र. (अ) व (ब) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

ड) वरील अनु क्र. (अ), (ब) व (क) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

२. सेवा प्रवेश नियम / जाहिरात/अधिसूचनेमध्ये अनुभव विहित केल्याप्रमाणे, अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहित अनुभवाचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

३. वरील निकष लावूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल.

**टीप:-** आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एससीवाय १२०५/प्र.क. १८९/म-७, दिनांक २३ जानेवारी २००६ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास, शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगा/मुलगी) होय.

**इतर सर्वसाधारण अटी / शर्ती / सूचना :**

१. उमेदवार हा भारताचा नागरीक असावा. आणि महाराष्ट्रात १५ वर्षे अधिवास (Domicile) करीत असल्याबाबतचे त्याने सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे कार्यालयाकडील) किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबाबत जन्म दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तसाच अर्थ असेल.

२. शैक्षणिक अर्हते व्यतिरीक्त गट 'अ', 'ब' आणि 'क' मधील सर्व पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना नेमणूकीसाठी दि.०४ फेब्रुवारी, २०१३ व समान क्रमांकाचे शासन पुरकपत्र दि.०८ जानेवारी, २०१८ मधील तदतुदीनुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत संगणक व माहिती तंत्रज्ञान व संबंधित विषय घेवून उत्तीर्ण अथवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत पदवी किंवा पदवीका अथवा इंडियन सिर्टिफिकेट ऑफ स्कुल एज्युकेशन (ICSC) यांच्या मार्फत दहावी व बारावी परिक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये संगणक व माहिती तंत्रज्ञान विषय घेवून उत्तीर्ण व त्याबाबतचे प्रमाणपत्र अथवा दि.16 जुलै 2018 चे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद (MSCE) पुणे यांचे मार्फत घेण्यात आलेल्या गर्व्हनमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपिंग बेसिक कोर्स(GCC-TBC) अंतर्गत बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/हिंदी- 30 अथवा 40 श.प्र.मि सादर करणे आवश्यक राहील.

३. टंकलेखन प्रमाणपत्राची आवश्यकता असलेल्या पदांकरीता, उमेदवारांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट अथवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेग मर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. इतर कोणतेही प्रमाणपत्र अनुज्ञेय असणार नाही.



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

३.१ - महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी पारित केलेल्या शासन निर्णयान्वये दिव्यांग/अनाथ/माजी सैनिक यांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत व दोन संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार सध्या लिपिक टंकलेखक या पदास टंकलेखनाचे (इंग्रजी/मराठी) प्रमाणपत्र Upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

३.२ महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी पारित केलेल्या शासन निर्णयान्वये भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त/अंशकालीन पदवीधर उमेदवार जर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्ष इतका अवधी देण्यात येत आहे. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार सध्या लिपिक टंकलेखक या पदास टंकलेखनाचे (इंग्रजी/मराठी) प्रमाणपत्र Upload करण्यापासून सूट देण्यात येत आहे.

३.३ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे दि.12 जानेवारी 2023 अन्वये लिपिक टंकलेखक या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे केवळ मराठी टंकलेखन 30 शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे प्रमाणपत्र असल्यास त्याने सदर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल. इंग्रजी 40 शब्द प्रति मिनिट टंकलेखन वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून 04 वर्षात प्राप्त करावायाचे असल्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांना सदर प्रमाणपत्र Upload करणेपासून सूट देण्यात येत आहे.

अथवा

लिपिक टंकलेखक या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे केवळ इंग्रजी टंकलेखन 40 शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे प्रमाणपत्र असल्यास त्याने सदर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल. मराठी 30 शब्द प्रति मिनिट टंकलेखन वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून 04 वर्षात प्राप्त करावायाचे असल्याने अर्ज करणाऱ्या उमेदवारांना सदर प्रमाणपत्र Upload करणेपासून सूट देण्यात येत आहे.

४. निवड झालेल्या उमेदवाराला नियमित तत्त्वावर नियुक्तीनंतर सोलापूर महानगरपालिका सेवा विनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, ५९ मधील तरतुदी लागू होतील.

**५. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/सेवा-४, दि.३१ ऑक्टोबर २००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना/ राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (DCPS/NPS) लागू राहील.**

**६. शासन निर्णय क्र. संकिर्ण/२००७/पडताळणी /नवि-२६, दि. २१ नोव्हेंबर २००७ अन्वये, निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच संबंधित उमेदवारास नियुक्ती पत्र देण्यात येईल.**

७. महाराष्ट्र नागरी सेवा, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियम, २००५ (महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एम. आर. व्ही- २०००/प्र.क्र.१७/२०००/२०१२, दि.०१ जुलै २००५) अन्वये उमेदवाराने नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

८. उपरोक्त पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीनंतर उमेदवाराची मेडीकल बोर्ड, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीयदृष्ट्या पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

९. उमेदवारांनी दहावीच्या परिक्षेत मराठी विषय घेवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, त्यास मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे आवश्यक आहे. जे सदरचे अट पुर्ण करत नाहीत अशा उमेदवारांना मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

१०. माजी सैनिक उमेदवाराने, राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील येणाऱ्या कार्यालयांकडे विहित पदांसाठी अर्ज केले असतील तर त्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१४/(प्र.क्र.३६४/१४)/२८, दि. ०३ जून, २०१६ मधील तरतूदी लागू राहतील.

११. उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारची विनंती / अर्ज स्विकारले जाणार नाही अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत.

१२. नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवाराने विहीत केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र / वचनपत्र / करारपत्र इ. विशिष्ट स्वरूपात भरून दिल्याशिवाय महानगरपालिका सेवेत रूजू करून घेतले जाणार नाही.

१३. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

**१४. नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधीकरीता नियुक्ती देण्यात आलेल्या पदाचे मूळ वेतन प्रथमत: दोन वर्ष कालावधीकरीता लागू राहील. परिविक्षाधीन कालावधी नियमित झाल्यानंतर इतर देय भत्ते लागू राहिल.**

**१५. नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी सोलापूर महानगरपालिकेच्या दि.15 डिसेंबर 2022 रोजीने मंजूर सेवाप्रवेश मधील तरतूदीनुसार नेमणुकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी लागू असेल. तसेच अशी उमेदवारांचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि त्यासंबंधीची कारणे नमूद करून परिविक्षाधीन कालावधी 12 पर्यंत महिने वाढविण्यात येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचारी/ अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात येईल.**

१६. भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित किंवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी त्यांचेकडे राखून ठेवले आहेत.

१७. निवड झालेल्या उमेदवारास महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करून दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या पदांना निवास उपलब्ध करून देणे आवश्यक आहे अशा पदावर नियुक्ती झाल्यास व भविष्यात त्यांना निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास त्यांना दरमहा निवास भाडे भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

१८. उपरोक्त पदाकरीता शासनाकडील किंवा खाजगी कंपनी कडील उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवाराची निवड/नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल.



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

१९. उमेदवारांनी परिविक्षाधीन कालावधीमध्ये अथवा वाढीव परिविक्षाधीन कालावधीमध्ये कामाचा अपेक्षित दर्जा न प्राप्त केल्यास आणि किंवा विहीत विभागीय परीक्षा, परिविक्षाधीन कालावधीमध्ये उत्तीर्ण न केल्यास आणि अशा तऱ्हेने त्यांचे काम योग्य अथवा अनुरुप न आढळल्यास ते सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील.

२०. या जाहिरातीव्दारे सरळ सेवेने करण्यात येणाऱ्या नियुक्त्या तात्पुरत्या / अस्थायी स्वरुपाच्या असतील व त्या संबंधी पदांच्या सेवा प्रवेश नियमावलीतील अटी व शर्ती व अन्य बाबींची पूर्तता केल्यानंतर नियमीत करण्यात येतील.

२१. सोलापूर महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबंधितावर बंधनकारक असतील.

२२. परीक्षेसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवासखर्च देय नाही.

२३. नियुक्तीकरीता निवड झालेले उमेदवार हे सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीत कोठेही किंवा सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर सोलापूर महानगरपालिकेचे कार्यालय जेथे असेल तेथे किंवा सोलापूर महानगरपालिका भविष्यकाळात कार्यालय सुरू करू शकेल, तेथे पदस्थापना केले जाण्यास पात्र ठरतील.

२४. सरळसेवेने नियुक्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी सोलापूर महानगरपालिकेने वेळोवेळी विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

**२५. फायरमन व सुरक्षा रक्षक पदांकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान,बुध्दीमत्ता चाचणी व विषयाशी संबंधित 60 वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरूपाचे 120 गुणांची एक तास ऑनलाईन परीक्षा व मैदानी क्षमता चाचणी परीक्षेकरीता 80 गुण अशी एकूण 200 गुणांची परीक्षा असेल.**

**तसेच इतर सर्व पदांकरीता मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान,बुध्दीमत्ता चाचणी व विषयाशी संबंधित 100 वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरूपाचे 200 गुणांची दोन तासाची ऑनलाईन परीक्षा असेल.**

**२६. फायरमन व सुरक्षा रक्षक पदांकरीता अर्जात नमूद करण्यात आलेली शारिरीक पात्रता मैदानी चाचणीच्या वेळी तपासण्यात येईल. पदास आवश्यक असलेली किमान पात्रता प्राप्त न केल्यास उमेदवाराची उमेदवारी/निवड रद्द करण्यात येईल.**

### -: खेळाडू आरक्षण :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै २०१६. तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: संकीर्ण- १७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२. प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

३. खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४. कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवाराचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारसी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

५. एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उप संचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

## पात्र क्रीडा स्पर्धा

| **क्रीडा विषयक अर्हता** | **खेळविषयक पात्रता** | |
|---|---|---|
| | **वैयक्तिक स्पर्धा** | **सांघिक स्पर्धा** |
| **गट-अ साठी पात्र क्रीडा स्पर्धा**<br>**१. अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा :-**<br>I) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा.<br>II) एशियन्स गेम्स.<br>III) जागतिक क्रीडा स्पर्धा.<br>IV) एशियन चॅम्पियनशीप.<br>V) कॉमनवेल्थ गेम्स.<br>VI) कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप,<br>VII) युथ ऑलिम्पिक,<br>VIII) ग्रँडमास्टर (बुध्दिबळ)<br>**२.पॅरालिम्पिंक आंतरराष्ट्रीय स्पर्धा :-**<br>I) पॅरालिम्पिक गेम्स,<br>II) पॅरा एशियन गेम्स.<br>III) वर्ल्ड पॅरालिम्पिक गेम्स..<br>**३. जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा**:-<br>I) जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा बोर्डाने आयोजित केलेले खेळ<br>**४. आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजित जागतिक शालेय क्रीडा स्पर्धा** :-<br>आंतरराष्ट्रीय शालेय महासंघादारे आयोजित केलेले खेळ..<br>५. ग्रँड मास्टर किताब | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक / ग्रँडमास्टर किताब अथवा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक |



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

| | | |
|---|---|---|
| (टिप:- उपरोक्त नमूद अ.क्र. १, 3, व ४ या क्रीडा स्पर्धाना ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धांचा समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५% आरक्षणासाठी पात्र राहतील) | | |
| **गट-ब साठी पात्र क्रीडा स्पर्धा**<br>**गट अ पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू**<br>**अथवा**<br>**१.अधिकृत आंतरराष्ट्रीय कनिष्ठ गटातील :-**<br>I) ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियशीप<br>II) युथ कॉमनवेल्थ गेम्स<br>III) कनिष्ठ गटातील एशियन चॅम्पियनशीप<br>IV) कनिष्ठ गटातील कॉमनवेल्थ चॅम्पियनशीप<br>v) आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा (बुद्धिबळ)<br>**२. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गट :-**<br>I) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा,<br>II) अधिकृत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा (वरिष्ठ गट)<br>**३. पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय स्पर्धा**<br>I) पॅरा ऑलिम्पिक राष्ट्रीय अजिंक्य पद स्पर्धा<br>1. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा.<br>2. राष्ट्रीय ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धा<br>3. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा<br>4. आंतरराष्ट्रीय मास्टर स्पर्धा<br>(टिप: अ.क्र. १,२,४,५, व ६ या स्पर्धामधील ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दीबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र राहतील.) | महाराष्ट्राच्या खेळाडूने भारताचे प्रतिनिधित्व करताना / महाराष्ट्राचे / विद्यापिठाचे प्रतिनिधित्व करताना प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य मिळविणे आवश्यक/ अथवा आंतरराष्ट्रीय मास्टर किताब मिळविणे आवश्यक | महाराष्ट्राच्या खेळाडूचा समावेश असलेल्या भारतीय संघाने. महाराष्ट्राच्या/ विद्यापिठाचे संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक / ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत सहभाग. |
| **गट-क साठी पात्र क्रीडा स्पर्धा**<br>**गट-अ व गट ब या पदाकरीता विहीत** | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे / राज्य स्तरावर | राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे / राज्य स्तरावर |

| | | |
|---|---|---|
| **केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू अथवा**<br>**१.राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट:-**<br>I) राष्ट्रीय ज्यूनियर गट अजिंक्यपद स्पर्धा<br>**2.राज्य स्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा :-**<br>I) राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा<br>1. राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा:-<br>2. राज्यस्तर ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धा<br>3.राज्यस्तरआंतरविद्यापीठ स्पर्धा(अश्वमेध )<br>4. राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा<br>5. राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा<br>6. राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा<br>(टिप अ.क्र. १ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी व खो-खो हे देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी असतील.) | संबंधित विभाग / जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करून प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक | संबंधित विभाग / जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करून संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक |
| **गट-ड साठी पात्र क्रीडा स्पर्धा**<br>अ/ब/ क या पदाकरीता विहित केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू<br>अथवा<br>१. राज्यस्तर कनिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा | प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक मिळविणे आवश्यक | संघाने प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान / सुवर्ण, रौप्य किंवा कास्य मिळविणे आवश्यक |
| २. वरिष्ठ गटातील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धातील सहभाग | वरीष्ठ गट स्पर्धेत सहभाग | वरीष्ठ गट स्पर्धेत सहभाग |
| ३. पॅराऑलिम्पिक राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा वरिष्ठ गटातील सहभाग.<br>(टिप - अ.क्र. १ व २ मधील सर्व क्रीडा स्पर्धांमधील खेळ हे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कबड्डी व खो-खो हे नमूद देशी खेळच ५% खेळाडू आरक्षणासाठी पात्र असतील.) | वरीष्ठ गट स्पर्धेत सहभाग | वरीष्ठ गट स्पर्धेत सहभाग |

- **टिप:- क्रिडा प्रमाणपत्राची वैधता पडताळणी अंती उमेदवारास नियुक्ती पत्र देण्यात येईल.**



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

**-: दिव्यांग आरक्षण :-**

१.दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ. दिनांक २९ मे २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

२. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील. भरती करावयाच्या एकूण पदांच्या टक्केवारीवर दिव्यांग आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

| पदनाम | कर्तव्ये / जबाबदारी | अपेक्षित शारिरीक क्षमता / पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| पशु शल्य चिकीत्सक पशु वैद्यकीय अधिकारी | महागरपालिकेची पशु विषयक सर्व कामे पाहणे व त्यावर नियत्रंण ठेवणे, प्राणी संग्रहालयाकडील पशु व प्राणी तसेच पक्षी यांवर देखरेख व संवर्धन करणे | S, ST,BN,RW,SE,H, MF | A)D, HH,<br>B) OA,BA, OL, Dw, AAV,<br>C) SLD, MI<br>D) MD INCOLVING (A) TO (C) above |
| उद्यान अधिक्षक | महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील उदयानांची देखभाल करणे, उदयान विभागातील उदयान सहाय्यक , माळी, व कर्मचारी यांवर नियत्रंण ठेवणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे | S, ST,W,BN, RW, SE,H, C, MF, | A) B, LV<br>B) D, HH<br>C) OA, BA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>D) ASD (M, MoD), SLD, MI<br>E) MD involving (A) to (D) above |
| कनिष्ठ अभियंता (विदयुत) | सोलापूर महानगरपालिकेकडील विदयुत विषयीची कामे करणे, कार्यरत क्षेत्रात विकास कामांतर्गत सर्वेक्षण करणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पाचे संकल्प चित्रानुसार होत आहे किंवा नाही याचे देखरेख व नियत्रंण, कामांचा दर्जा तपासणे. महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे. | S, ST, W, BN, KC, PP, MF, RW, SE, C | A) D, HH<br>B) OL, LC, Dw, AAV<br>C) SLD, MI<br>D) MD involving (A) to (C) above |
| सहाय्यक प्रयोगशाळा तंत्रज्ञ | महानगरपालिकेच्या सार्व आरोग्य विभागाकडील पाणी तपासणी संबंधित कामे करणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे | S, ST, W, BN, MF, RW, SE, H, C | A) D, HH<br>B) OA, OL, BL, OAL, LC, Dw, AAV<br>C) ID, SLD, MI<br>D) MD involving (A) to (C) above |
| सहाय्यक उद्यान अधिक्षक | महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील उदयानांची देखभाल करणे, उदयान विभागातील माळी, व कर्मचारी यांवर नियत्रंण ठेवणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे | S, ST, W, BN, RW, SE, H, C, MF | A) B, LV<br>B) D, HH<br>C) OA, BA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>D) ASD (M, MoD), SLD, MI<br>E) MD involving (A) to(D) above |



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

| | | | |
|---|---|---|---|
| लॅबटेक्निशियन | महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवेशी सहाय्यकारी व इतर संबंधित कामे करणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे | S, ST, W, BN, MF, RW, SE, H, C | A) D, HH<br>B) OA, OL, BL, OAL, LC, Dw, AAV<br>C) ID, SLD, MI<br>D) MD involving (A) to(C) above |
| आरोग्य निरीक्षक | महानगरपालिका क्षेत्रामध्ये साफसफाईचे कामे करून घेणे, कामांवर सनियंत्रण ठेवणे, विविध सफाई अभियांनामध्ये सामिल होणे, त्यांची अंमलबजावणी करणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे | S, ST, W, BN, RW, SE, H, C | A) B, LV<br>B) D, HH<br>C) OA, OL, CP, LC, Dw, AAV<br>D) ASD (M), SLD, MI<br>E) MD Involving (A) to(D) above |
| स्टेनो टायपिस्ट | विभाग प्रमुख/कार्यालयीन प्रमुख/पदाधिकारी यांचे दूरध्वनी हाताळणे, श्रुतलेखन घेणे, टंकलेखन करणे इत्यादी, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे, | S, ST, W, L, MF, RW, SE, H, C | A) B, LV<br>B) D, HH<br>C) OA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV<br>D) MI, SLD<br>E) MD involving (A) to(D) above |
| अनुरेखक (ट्रेसर) | नकाशे काढणे, नकाशा रंगविणे, नकाशांचे आरेखन करणे, प्लॅन तयार करणे, झोन तयार करणे तसेच प्राप्त विकास परवानगी/बांधकाम परवानगी बाबतचे प्रस्तावांवर अभिप्राय प्रस्तावित करणे,महानगरपालिकेच्या कार्यनियमावली नुसार कामे करणे. | S, ST, W, BN, L, KC, PP, MF, RW, SE, H | A) LV<br>B) D, HH<br>C) OA, BA, BL, OL, Dw, AAV<br>D) SLD, MI, ASD (M) E)MD Involving (A) to (D) above |
| कनिष्ठ श्रेणी लिपीक | महानगरपालिकेतील लिपिक संवर्गाची सर्व कर्तव्य पार पाडणे, महानगरपालिकेच्या कार्यनियामवलीनुसार कामे करणे | S, ST, W, BN, RW, SE, H, C, MF | A) B, LV<br>B) D, HH<br>C) OA, BA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy<br>D) ASD (M, MoD), ID, SLD, MI<br>E) MD involving (A) to(D) above |
| मिडवाईफ | महानगरपालिकेच्या वैद्यकीय सेवेशी सहाय्यकारी व इतर संबंधित कामे करणे, आरोग्य मोहिमा राबविणे, महानगरपालिकेच्या कार्यनियमावलीनुसार कामे करणे | S, ST, W, MF, RW, SE, H, C | a) LV<br>b) OL, CP, LC, Dw, AAV<br>c) SLD, MI<br>d) MD involving (A) to (C) above |

**FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED:-**

S= Sitting, ST=Standing, W=Walking, BN Bending, L=Lifting MF = Manipulation with Fingers, RW=Reading & Writing, SE=Seeing, H= Hearing, C-Communication

**CATEGORY ABBREVIATION USED**

B=Blind, LV=Low Vision, D=Deaf, HH=Hard of Hearing, OA=One Arm, OL=One Leg BA=Both Arms, BL=Both Leg, OAL=One Arm and One Leg BLOA = Both leg & one arm, BLA=Both Legs Arms, CP Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, Dw=Dwarfism, AAV=Acid Attack Victims, MDy= Muscular Dystrophy, ASD=Autism Spectrum Disorder (M=Mild, MoD=Moderate), ID = Intellectual Disability, SLD=Specific Learning DisabilityMI= Mental Illness, MD=Multiple Disabilities



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

३. दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

४. दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे. विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

५. संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार आरक्षण सवलतीसाठी पात्र असतील.

६. लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

   a. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती लागू राहतील.
   b. दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती लागू राहतील.

७. लक्षणीय दिव्यांग उमेदवारांसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि- २०१८/प्र.क्र. ४६ / आरोग्य- ६. दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

८. लक्षणीय दिव्यांगत्व असणाऱ्या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार / उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही.

**लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी (Locomotor Disability and cerebral palsy)**

लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे लोकोमोटर अपंगत्व आणि सेरेब्रल पाल्सी बाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादेपर्यंत किमान (४०% दिव्यांग) असेल अशा उमेदवारांसाठी परिक्षेच्या प्रती तास २० मिनिटे अधिक वेळ अनुज्ञेय असेल.

**मदतनीस वापरणाऱ्या दिव्यांग उमेदवारासाठी सूचना:-**

दृष्टिहीन उमेदवार आणि असे उमेदवार ज्यांच्या लेखनाच्या गतीवर कोणत्याही कारणास्तव कायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम होत आहे, ते ऑनलाइन परिक्षेदरम्यान त्यांच्या स्वतःच्या मदतनीसाचा, खाली दिलेल्या मर्यादेच्या अधीन राहून' वापर करू शकतात.

उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी मदतनीसाच्या मदती विषयी नोंदणी केली आहे व ज्यांना परीक्षेच्या दिवशी मदतनीसाची मदत घेणेस अनुमती देण्यात आली आहे, अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल. तथापि अशा उमेदवाराने परीक्षेच्या वेळी किमान ४०% अपंगत्व असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

1. परीक्षेपुर्वी ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवाराला त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या मदतनीसाची व्यवस्था करावी लागेल.
2. परीक्षेपुर्वी ऑनलाईन नोंदणी केलेल्या मदतनीस यांनी परीक्षेच्या दिवशी ओळखपत्र (Photo ID) बाळगणे अनिवार्य राहिल.
3. मदतनीस कोणत्याही शैक्षणिक प्रवाहातील असू शकतो. तथापि, विशेष तज्ञ अधिकाऱ्यांच्या पदांसाठी मदतनीस हा त्या पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक प्रवाहातील नसावा. तसेच सदर मदतनीसाची शैक्षणिक पात्रता ही उमेदवाराच्या पदाच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या कमीत कमी, एक स्तर कमी असावी.
4. उमेदवाराने नेमलेला मदतनीस हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि मदतनीस या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत मदतनीसाच्या सेवांसाठी पात्र असलेल्या आणि वापरू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी काळजीपूर्वक अर्ज करताना सूचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही.
5. एका उमेदवारासाठी मदतनीस म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीस दुसऱ्या उमेदवारासाठी मदतनीस म्हणून काम करता येणार नाही.
6. उमेदवार आणि मदतनीस या उचित हमीपत्र लागेल की, मदतनीसाने वर नमूद केलेल्या मदतनीसासाठी सर्व विहित पात्रता निकषाची पूर्तता केली आहे. पुढे जर नंतर असे आढळून आले की, त्याने तिने ठरवून दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा भौतिक तथ्ये दडवली आहेत. तर सदर उमेदवाराची उत्तर पत्रिका विचारात घेतली जाणार नाही व त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.
7. जे उमेदवार मदतनीसाचा वापर करतात त्यांना परिक्षेच्या विहीत वेळेच्या प्रत्येक तासाला २० मिनिटे अधिक वेळ अनुज्ञेय राहील
8. मदतनीसाने स्वतःहून उत्तर देऊ नये, असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारास परीक्षा देणेपासून रोखले जाईल व त्याची उमेदवारी रद्द केली जाईल.
9. फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल तर त्यांनी / तिने त्यासाठी नोंदणी अर्ज केला नसेल तर चाचणी आयोजित करणाऱ्या यंत्रणाला अशी सवलत देणे शक्य होणार नाही. सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी अर्ज न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतीना परवानगी दिली जाणार नाही.
10. परिक्षेदरम्यान, कोणत्याही टप्प्यावर मदतनीस स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल, तसेच परिक्षेनंतर लिखित प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल जर चाचणी प्रशासक कर्मचाऱ्यांकडून दिला गेला तर अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

**-: अनाथ आरक्षण :-**

1. अनाथ व्यक्तीच आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक अनाथ-२०१४/प्र.क. १८२/का-03, दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील,

2. अनाथासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे. त्या प्रवर्गातून करण्यात येईल.
3. प्रस्तुत पदासाठी अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.
4. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- अनाव-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३. दि. २० ऑगस्ट, २०१९ अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय मध्ये सवलत देण्यात येईल,
5. महाराष्ट्र शासन. महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. अनाथ-२०२२/प्र.क्र. १२२/का-०३. दि.०६ एप्रिल २०२३ अन्वये, अनाथ प्रवगासाठी उपलब्ध जागा संस्थात्मक व संस्थाबाह्य प्रवर्गास विभागून देण्यात येतील.

**विशेष सूचना:**

1. सोलापूर महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे / अभिलेखे हे महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील.
2. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
3. मध्यस्थ / ठग / सोलापूर महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती, यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत.
4. प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांबाबत उमेदवारांस काही हरकत असल्यास प्रति प्रश्न रु.१००/- इतके शुल्क आकारले जाईल.
5. वेगवेगळ्या सत्रांमध्ये पार पडणाऱ्या परिक्षेमधील प्रश्नपत्रिका वेगवेगळ्या असतील. अशा वेळी परीक्षार्थीची संख्या विचारात घेऊन परीक्षा एकापेक्षा अनेक सत्रांत पार पाडवयाची झाल्यास भिन्न प्रश्नपत्रिकांच्या काठिण्य पातळीचे समानीकरण (Normalization) करण्यात येईल व त्यासाठी Mean Standard Deviation Method या सूत्र पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.
6. परीक्षे संबंधी / प्रतिक्षा यादी / कागदपत्रे तपासणी बाबत / नियुक्ती आदेश याबाबतची माहिती केवळ SMS/Email द्वारे कळविण्यात येईल. कोणताही पत्र व्यवहार पोष्टा मार्फत / पत्त्यावर केला जाणार नाही.

**-: सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

- नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/ परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील:-
  (एक) जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय / व्यावसायिक परीक्षा.



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM

(दोन) हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा.

(तीन) वैद्यकीय क्षेत्रातील निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ अंतर्गत नोंदणी झाली असणे आवश्यक आहे किंवा भारतीय आयुर्विज्ञान परिषद कायदा १९५६ अंतर्गत भारतीय आयुर्विज्ञान परिषद नोंदवहीत उमेदवाराच्या नावाचा समावेश असणे आवश्यक राहील.

(चार) अग्निशमन व सुरक्षा सेवेसंबंधी असणारी आवश्यक शारीरिक चाचणी उमेदवारास पात्र करावी लागेल.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) मधील नियम ५३, ५४ व अनुसूची ड मधील प्रकरण ३ च्या अधिन राहून सदरची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.**

- टिप :- उमेदवारांकरीता वर नमूद केलेल्या सूचना/निर्देशामध्ये काही संदिग्धता वाटत असल्यास शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय पाहण्यात यावे. शासनाच्या संकेतस्थळावर पाहण्याकरीता ती उपलब्ध आहेत.

दिनांक: / /२०२३
ठिकाण: सोलापूर

Signed by
Nikhil Bajirao More
Date: 09-11-2023 14:24:41

( निखिल मोरे )
**अति.आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका**



Generated from eOffice by JAGANNATH GURUNATH KELLURKAR, SMC-JR_CLERK(JGK), JR CLERK, SOLAPUR MUNICIPAL CORPORATION on 09/11/2023 03:19 PM